संशोधन आराखडा

(Synopsis)

''लघु उद्योगांच्या वित्तीय, मानवी व विपणन व्यवस्थापनाचा चिकीत्सक अभ्यास– संदर्भ लातूर जिल्हा''

सादर

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वणिज्य शाखेतील आचार्य (Ph.D) पदवी प्राप्तीसाठी संशोधन आराखडा सादर

संशोधक

संतोष आबासाहेब जोहरी

एम.कॉम.

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ. सुधीर विनायकराव माने

एम.कॉम., पीएच.डी.

वाणिज्य विभागप्रमुख

शिवनेरी, कॉलेज, शिरूर अनंतपाळ

२०१६

''लघु उद्योगांच्या वित्तीय, मानवी व विपणन व्यवस्थापनाचा चिकीत्सक अभ्यास– संदर्भ लातूर जिल्हा''

प्रस्तावना : **(Introduction)**

आजच्या स्पर्धेच्या युगात तरूणांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योग व्यवसायात पडावे असे नेहमीच सर्वत्र म्हटले जाते. कारण एखाद्याने स्वत:चा उद्योग सुरू केला तर त्याला स्वयंरोजगाराची संधी तर प्राप्त होतेच या खेरीज त्याचा उद्योग व्यवसाय सुव्यवस्थित रित्या चालू झाला तर इतरही बऱ्याच व्यक्तींना रोजगाराची संधी निर्माण होऊ शकते. तसेच त्या व्यवसायाच्या निगडीत इतर व्यक्तींना रोजगार प्राप्त होतो अथवा त्यांच्या उदरनिर्वाहांची व्यवस्थाही होत असते. त्यामुळे वाढत्या बेकारीची समस्या सोडविण्यासाठी म्हणुन जे उपाय योजले जातात त्यात प्रामुख्याने उद्योग व्यवसायास प्राधान्य दिले जाते.

आजच्या काळात औद्योगिक दृष्टीने प्रगत असणाऱ्या राष्ट्रांनाच विकसित राष्ट्रे म्हणून ओळखली जातात. भारत हे एक विकसनशील राष्ट्र आहे. भारताची लोकसंख्या अधिक असल्यामुळे या ठिकाणी बेकारीची समस्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसुन येते. तसेच आपल्या देशातील भांडवलाच्या कमतरतेमुळेही त्याला उद्योग सुरू करणे ही अवघड बाब आहे. त्या साठी लघुउद्योग हे अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडतात.

लघु उद्योगाचा एकुण देशाअंर्तगत वाटा सात टक्के आहे. लघु उद्योग हे अनेक दृष्टीने महत्वाचे असतात. त्यामूळे उत्पादनाची निर्मिती तर होतेच परंतु रोजगार निर्मीती देखील मोठया प्रमाणावर होते. लघु उद्योगावर आधारीतही इतर छोटया मोठया उद्योजकांना त्यांवर आपली उपजीविका भागविता येते.

महाराष्ट्र हे भारतातील औद्योगिकदृष्टया प्रगत राज्य असुन याठिकाणी लघु उद्योगाचा विकास झपाटयांने होत आहे. महाराष्ट्रातील इतर विभागापेक्षा मराठवाडा विभाग हा मागासलेला समजला जातो. त्या मध्येच लातूर हा विकसंनशील जिल्हा समजण्यात येतो. तरीही या ठिकाणी प्रगतीला मोठया प्रमाणावर वाव आहे व लघु उद्योगाच्या दृष्टीकोनातुन संशोधनासाठी अजुन बराच वाव आहे.

या स्पर्धेच्या युगात येथील लघुउद्योगांना टिकाव धरून राहण्यासाठी कार्यक्षम वित्तीय व्यवस्थापन असणे अत्यंत जरूरीचे आहे त्याच सोबत व्यवसायाची कास ज्या व्यवस्थापनावर अवलंबुन असते त्या मानवी व्यवस्थापनाचा तसेच बाजारपेठ संशोधन अथवा विपणन पध्द्तीचा चिकीत्सक पध्द्तीने अभ्यास करणे जरूरीचे आहे. त्यामुळे या भागातील उद्योजक व्यवसायीकात एक प्रकारचे चैतन्य निर्माण होऊन

उत्पादन वाढ, रोजगारीत वाढ निश्चीतपणे होऊन लातूर जिल्ह्याचा औद्योगिक दृष्ट्या व त्यामुळे साहजिकच सर्वांगिण विकास होईल अशी खात्री बाळगता येते.

संशोधनाचे महत्व आणि गरज : **(Importance and Need of Research)**

गरज ही संशोधनाची जननी आहे. सुधारणा व विकास हा प्रत्येक क्षेत्रात आवश्यक असतो त्या दृष्टीकोनातून संशोधनाचे महत्व आणि गरज हे पुढील मद्दयावरून स्पष्ट होऊ शकते.

१. लघु उद्योगाची महत्वपुर्ण भुमिका :– लघुउद्योग देशाच्या विकासामध्ये एक प्रकारे महत्वपुर्ण भुमिका बजावीत असतात ही ज्यामुळे देशाच्या संर्वांगीण विकास होत असतो.

२. लघु उद्योग एक जीवंत क्षेत्र : लघु उद्योग एक व्यापक क्षेत्र असुन ज्यामध्ये लघु, अति लघु आणि कुटीरोद्योगाचा समावेश होतो. ज्याचा आपल्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या नियोजित विकासात एक महत्वपुर्ण स्थान आहे. आणि हे आपल्या राष्ट्राच्या अत्यंत जीवंत क्षेत्र समाविष्ट होते.

३. स्व मालकी स्थापीत होते:– नौकरीमध्ये किती ही मोठे पद असले तरी ती एक प्रकारची कुणाचीतरी गुलामीची असते, परंतु व्यवसाय कितीही लहान असला तरी तो स्वतःच्या मालकीचा असतो व मालक म्हणुन त्या उद्योजकाचे अस्तित्व असते त्यामुळे एक प्रकारे स्व–मालकी या ठिकाणी प्रस्थापीत होत असते.

४. अर्थव्यवस्थेत भर पडते : लघु उद्योगाच्या विकासामुळे उत्पादनाची निर्मीती होते, त्यामुळे बाजारपेठेत अर्थिक उलाढाल होते. व साहजिकच देशाच्या अर्थ व्यवस्थेत भर पडते.

५. रोजगाराची संधी निर्माण होते: लघु उद्योग क्षेत्रातील सततच्या संशोधनाने हे लक्षात येते की, देशाच्या कानाकोपऱ्यातील प्रत्येक उद्योग व्यवसायामध्ये विविध प्रकारच्या अकुशल, कुशल, प्रशासकिय पदांची निर्मीती होत असते व मानवी बळ हा व्यवसायाचा महत्वाचा घटक आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या रोजगाराच्या संधी सातत्याने निर्माण होत असतात. त्या गरजुंना मिळवुन देता येतात.

६. बाजारपेठेंचे सर्वेक्षण होते: लघुउद्योगाच्या विपणन व्यवस्थापनाच्या अभ्यासात या जिल्ह्यातील बाजारपेठांचे सर्वेक्षण होते. त्यातील महत्वपुर्ण बाबींचा अभ्यास होतो. ज्याचा संशोधनात निश्चित उपयोग होतो.

७. शासनाचे धोरण, करप्रणालीचा अभ्यास याद्वारे होते: शासनाची धोरणे सातत्याने बदलत असतात या बदलत्या धोरणांचा अभ्यास संशोधनाद्वारे होतो तसेच उद्योजकांसाठीची असणारी कर प्रणाली ही अभ्यासणे गरजेचे असते.

८. व्यवसायाच्या आधुनिकीकरणाचा (अद्यावत बाबींचे तंत्रज्ञान, आकडेवारी, उपलब्ध होऊ शकणारे मनुष्यबळ, संभाव्य बाजारपेठ, इ.) चा लघु उद्योग संशोधनाद्वारा सखोल अभ्यास करता येतो.

९. वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास होतो: लघु उद्योग सुरूवात करीत असताना वित्तीय व्यवस्थापन अभ्यासणे अतिशय गरजेचे असते. कारण बचत व गुंतवणूकीच्या सवयी भांडवल व्यवस्थापन किंमत निश्चिती, कामगारांचे वेतन, व्यवसायातील नफा वाढविण्यांच्या योजना इत्यादी सर्व बाबींचा अभ्यास याद्वारे करता येतो.

१०.मानवी व्यवस्थापनाचा अभ्यास होतो: लघु उद्योगाचा अभ्यास करीत असताना त्यातील एक महत्वाचा भाग म्हणुन मानवी व्यवस्थापनाकडे ही पाहणे जरूरीचे होते. मानवी व्यवस्थापन जर उत्कृष्ट पध्दतीचे त्या व्यवसायात असेल तर तो व्यवसाय चांगल्या पध्दतीचे बांधला जाऊ शकतो.

११.प्रभावी विपणन व्यवस्थापन आखता येते: वस्तु व सेवा यांचा प्रवाह उत्पादकापासुन ते उपभोक्त्यांपर्यंत प्रवाहित करण्यात येणाऱ्या सर्व व्यावसायिक प्रक्रियांचा समावेश विपणनात होतो. उदा. प्रमाणीकरण, प्रतवारी, बांधणी, साठवणुक, वाहतुक, संदेशवहन, जाहिरात, विक्रयकला, बाजारपेठ संशोधन इत्यादी. व या सर्व व्यावसायीक प्रक्रियांचे व्यवस्थापन करून एक प्रकारे त्या लघु उद्योगाचे प्रभावी विपणन व्यवस्थापन आखणी करता येते.

१२.नव उद्योजकासाठी संशोधनाद्वारे महत्वाची माहिती आकडेवारी प्राप्त होते: लघुउद्योग संशोधनाद्वारे जी माहिती गोळा केली जाणार असते ती त्या प्रत्येक क्षेत्राचा, उद्योजकाचा, ग्राहकाचा, व्यापाऱ्याचा एका दृष्टीने सखोल असा अभ्यास करून त्याचा माहिती दर्शक म्हणुन नवउद्योजक तसेच ईच्छुक व्यावसायीक, त्या क्षेत्राचा अभ्यास करणारे विद्यार्थी, इतर संशोधक इत्यादींना त्यांच्या कार्यासाठी महत्वाची प्रत्यक्ष माहीती, प्राथमिक आकडेवारी प्राप्त होते.

वरील मुद्यांवरून या संशोधनाची गरज व महत्व आपल्या लक्षात येऊ शकते.

संदर्भीय साहित्याचा आढावा :(Review of Literature)

लघु उद्योगाच्या मागील कांही संदर्भ साहित्याचा आढावा घेत असताना पुढील कांही सर्वसाधारण बाबी लक्षात येतात.

१. प्रसाद (१९७४) – यांच्या अभ्यासात त्यांनी असे सांगितले आहे की, भारतातील लघु उद्योग क्षेत्र हे आकाराने जरी लहान असले तरी त्याची यशपुर्ती ही अतिशय मोठी आहे.

२. भाटी (१९७६) – यांच्या म्हणण्यानुसार बऱ्याचशा घटनांमध्ये औद्योगिक क्षेत्रातील बाह्य घटक हे जास्त किंमतीचा दर दर्शवितात.

३. गॅहम बॅनॉक (१९८१) यांनी आपल्या संशोधनात वैयक्तीक लघु उद्योगाच्या प्रत्यक्ष समस्यांचे ठळक पणे चित्र स्पष्ट केले आहे की, त्यांचा आर्थिक योजनेशी कसा व्याप्त स्वरूपाचा संबंध आहे तो आर्थिक चलनशक्ती विषयीचे मुळच्या लघुउद्योग क्षेत्रातील आणि सामाजीक क्षेत्रातील किंमत दरवाढीशिवायचे पुनरागमन या गोष्टींवर विश्वास दर्शवितो.

४. नारायण रेड्डी (१९८३) यांनी आपल्या संशोधन अहवालात असे नमुद केले आहे की, लघु उद्योग हे त्यांच्यासाठी उत्तम व सुधारीत पध्दतीने स्वत:ला विपणन, विपणन प्रशिक्षणातुन प्रचार आणि प्रसार की ज्याची कार्यकारी पध्दतीने सुरूवात करून स्वत:ला सुसज्ज करतात. त्याकरीता राष्ट्रीय पातळीवरील विपणन संस्थेची गरज आहे.

५. विनायक शंकरराव भोयर (१९८४) आपल्या संशोधन अहवालात स्पष्ट करतात की, सहकारी औद्योगिक क्षेत्रातील कार्यक्रम हे सहकारातील इतर क्षेत्राच्या शक्तीशाली घटकांशी संबंधीत असतात. की ज्याची क्षमता मागासलेल्या क्षेत्रातुन सुधारीत क्षेत्रामध्ये करण्याची निश्चितच असते.

६. अशोक कुमार सिंग (१९८५) यांनी त्यांच्या अहवालात बिहार मधील उपलब्ध होऊ शकणारे शासनाकडील साहय्य, सवलतीच्या योजना, साहित्याच्या सोयी आणि सुविधांच्या क्षमतेचा अभ्यास नमुद केल्याचे दिसुन येते. तसेच बिहारमधील लघु उद्योगाची भरभरून असलेली उपलब्धता, तेथील माहीती यांचा लेखाजोखा या अभ्यासात मांडला आहे.

७. हामीद एस. ए. (१९८९) यांनी आपल्या संशोधनात लघुउद्योग विकासाचे अर्थव्यवस्थेतील महत्व तसेच लघु उद्योग क्षेत्रातील विवीध संधीचे व योजनांचे विश्लेषण केलेले आहे. प्रस्तुत संशोधनात जम्मु व कश्मीर या राज्यातील लघु उद्योगांचा अभ्यास केलेला आहे. जम्मु व कश्मीर मधील हस्त कौशल्य, हॅडलुम व पर्यटन क्षेत्रातील लघु उद्योगांना संधी आहेत. यासाठीच्या विविध योजना स्पष्ट केलेल्या आहेत. परंतु संशोधकांने लघु उद्योगाचे व्यवस्थापन स्पष्ट केलेले नाही.

८. राव (१९९५) यांनी आपल्या संशांधनात लघु आणि मध्यम उद्योगाचे महत्व आणि त्याचा उदारीकरण व जागतीकीकरणाचा बाजारपेठेशी संबंधीत अभ्यास यांचा तंत्रज्ञानाची मागणी आणि बदल याची संभाव्यता व्यक्त केली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे : **(Objectives Of Research)**

१. लघु उद्योगाच्या वित्तीय व्यवस्थापनातील समस्यांचा अभ्यास करणे.
२. लघु उद्योगाच्या मानवी व्यवस्थापनातील समस्यांचा अभ्यास करणे.
३. लघु उद्योगाच्या विपणन समस्यांचा अभ्यास करणे.
४. लघु उद्योगाच्या वित्तीय व्यवस्थापनातील समस्येवर उपाय सुचविणे.
५. लघु उद्योगाच्या मानवी व्यवस्थापनातील समस्येवर उपाय सुचविणे.
६. लघु उद्योगाच्या विपणन व्यवस्थापनातील समस्येवर उपाय सुचविणे.

संशोधनाची गृहीतके : **(Hypothesis of Research)**

१. लघु उद्योगातील वित्तीय व्यवस्थापन दर्जेदार आहे.
२. लघु उद्योगातील मानवी व्यवस्थापन दर्जेदार आहे.
३. लघु उद्योगातील विपणन व्यवस्थापन दर्जेदार आहे.

संशोधन पध्दती **(Research Methodology)**

संशोधकाला लघु उद्योगाच्या वित्तीय व्यवस्थापन, मानवी व्यवस्थापन, विपणन व्यवस्थापन या संदर्भातील माहिती संकलीत करावयाची असल्यामुळे संशोधक संबंधीत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करेल.

संशोधनाची तंत्रे व साधने **(Tool and Techniques of Data Analysis)**

संबंधीत संशोधणासाठी संशोधकाला लघु उद्योगातील वित्त, मानवी व्यवस्थापन, विपणन या संदर्भातील माहिती संकलन व विश्लेषण करावयाचे असल्यामूळे संशोधक खालील साधनांचा उपयोग करेल.

अ) मुलाखती

ब) प्रश्नावली

क)पद्निश्चयी श्रेणी (श्रेणीकरण)

अभ्यास प्रकरणे **(Chapter Study)**

प्रस्तुत अभ्यासाची विभागणी एकुण आठ प्रकरणात केली आहे. अभ्यासातील मुख्य प्रकरणे आणि त्या अंतर्गत केलेल्या संशोधनाचा थोडक्यात आढावा खालीप्रमाणे आहे.

प्रकरण पहिले :– प्रस्तावना

पहिल्या प्रकरणामध्ये अभ्यासाची प्रस्तावना, महत्व आणि ठरवलेले उद्देश स्पष्ट कली आहेत. त्याच बरोबर अभ्यासात वापरण्यात आलेली संशोधन पध्दती आणि एकुण प्रकरणाचा तपशील सारांश रूपाने केला जाणार आहे.

प्रकरण दुसरे :– संदर्भ साहित्याचा अभ्यास

या प्रकरणामध्ये संशोधकांनी या क्षेत्रात केलेले संशोधन, अभ्यासकासाठी उपलब्ध करून दिलेल्या संदर्भ साहित्याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे :– लघु उद्योगाचे स्वरूप व महत्व

लघुउद्योगांचे स्वरूप, व्याप्ती, लघुउद्योगाचे महत्व व लघुउद्योग स्थापन करण्याची प्रक्रिया तसेच लघुउद्योगांची सद्यस्थिती स्पष्ट केली जाणार आहे.

प्रकरण चौथे :– लघु उद्योगासाठीचे सरकारी धोरणे व योजना

अभ्यासाच्या चौथ्या प्रकरणात लघुउद्योगाच्या संदर्भात सरकारची धोरणे, विविध योजना स्पष्ट केल्या जाणार आहेत.

प्रकरण पाचवे :– लघु उद्योगाच्या वित्तीय,मानवी व विपणन व्यवस्थापनांचा अभ्यास

पाचव्या प्रकरणात लघुउद्योगाच्या अभ्यासासाठी निवड केलेल्या लातुर जिल्ह्यातील लघुउद्योगांच्या वित्तीय, मानवी व विपणन व्यवस्थापना मध्ये येणाऱ्या विविध घटकांचे प्रश्नावलीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीच्या आधारे विश्लेषण केले जाणार आहे.

प्रकरण सहावे :– संशोधन पध्दती

या प्रकरणात लघुउद्योगाच्या वित्तीय , मानवी व विपणन व्यवस्थापनाच्या संशोधन पध्दतीसाठी ज्या सर्वेक्षण, निरीक्षण पध्दतीचा वापर केला जाणार आहे त्या तंत्राचा सविस्तर अभ्यास केला जाईल.

प्रकरण सातवे :– लघु उद्योगांच्या वित्तीय, मानवी व विपणनाच्या संकलित माहितीचे विश्लेषण

या प्रकरणात उघुउद्योग विषयक वित्तीय, मानवी व विपणनाच्सा संकलित माहितीचे विश्लेषण आलेख, सारणी इत्यादी द्वारे करण्यात येणार आहे.

प्रकरण आठवे :– निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात अभ्यासाचे निष्कर्ष आणि शिफारशी दिल्या जाणार आहेत.

समाप्ती :–

वरिल सर्व मुद्यावरून “लघु उद्योगांच्या वित्तीय, मानवी व विपणन व्यवस्थापनाचा चिकीत्सक अभ्यास – संदर्भ लातुर जिल्हा” या शिर्षकाचा थोडक्यात संशोधन आराखडा लक्षात येऊ शकतो. या आराखडयात लघु उद्योगाची प्रास्तावीक माहिती, संबंधित संशोधनाचे महत्व आणि गरज, संदर्भ साहित्याचा आढावा, संशोधनाचे उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधनसाठीची संशोधन पध्दती, संशोधनाची तंत्रे व साधने यांचा वापर, प्रस्तुत प्रकरणाची यादी इत्यादी मुद्दे थोडक्यात व स्पष्टपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

संदर्भसुची :–

१. उद्योग संचानालय, महाराष्ट्र शासन, उद्योग साधना, जुन १९९५, महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र शासन.

२. विकास आयुक्त (लघु उद्योग) उद्योग मंत्रालय, भारत सरकार, लघु उद्योग क्षेत्र , ऑगस्ट १९९९ , आकाशदिप प्रिंटर्स , दरियागंज, नई दिल्ली – ११० ००२

३. Retrieved from http://www.Smallscaleindustryreviewofliterature.com

संशोधक विद्यार्थी

संतोष आबासाहेब जोहरी

संशोधक मार्गदर्शक

प्रा. डॉ. सुधीर विनायकराव माने